**<u>मध्य रेल</u>**

**मुख्य कार्यालय,**
**अभियांत्रिकी विभाग,**
**छ.शि.ट. मुंबई-40001.**

पत्र क्र.टी 103/पी.डब्ल्यूटी-18/XXI दिनांक : 18 जाने.2008

**<u>सी.ई.परिपत्र क क्र.190</u>**

विषय : बांधकाम स्थळावर सुरक्षितता निश्चित करण्यांकरिता प्रक्रिया आदेश ।

विभिन्न विभागांमध्ये गेज परिवर्तन दुसरी/तिसरी लाईन, रेल्वे विद्युतिकरण, रेल्वे विकास निगम लिमिटेड तसेच रहदारीच्या सुविधांकरिता अनेक अभियांत्रिकी, सिगनल तसेच दूरसंचार आणि विद्युत कार्य प्रगती पथावर आहेत ज्यांकरितां कार्यरत रेलवे लाइन जवळ खोदकाम उत्खनन, वाहने/उपकरणांची ये-जा यां गोष्टींची आवश्यकता असते. कार्यरत रेल्वे लाइन जवळ वरिल प्रकारचे काम करतांना रेलवे मार्गातील भौमितीय बदल घडणे, विद्युत/सिगनल तसेच दूरसंचार केबल विस्कळीत/खराब होणे, गतिशीलतेच्या मापात/प्रमाणांत बाधा येणे इत्यादि अडचणी संभवतात परिणामस्वरूप रहदारीमध्ये अव्यवस्थितपणा येतो. अपघातासारख्या असामान्य घटना घडू शकतात. त्यांकरिता यासंबंधित एक परिपत्र क./प्रपत्र जारी करण्याची आवश्यकता भासली आहे .

यानंतर, ओपन लाइन आणि निर्माण विभागाद्वारे कार्यरत रेलवे लाइन जवळ फार्मेशन तयार करण्यांसाठी जमीन कार्य (भराव), उत्खनन/खोदकाम, वाहने/उपकरणांचा संचार/ परिचालन सारख्या कामांची योजना आखणे व अशी काम करण्यांकरिता खालील दर्शविलेल्या सूचनांचे पालन केले जाईल, ज्यामुळे रेलवे मार्गात भौमितिय बदल घडणे, गतीमानतेच्या मापात/प्रमाणांत बाधा येणे, विद्युत/सिगनल तसेच दूरसंचार केबल्सनां होणा-या क्षति/नुकसानी पासून वाचवू शकेल, परिणामतः अपघाती किंवा असामान्य घटना घडतात.

## I. <u>कार्यरत रेलवे मार्गा जवळ कोणत्याही प्रकारचे काम सुरू करणे.</u>

**1.1 कार्यरत रेलवे मार्गाच्या जवळपास कोणतेही काम चालू करण्यापूर्वी प्रभारी इंजीनियर द्वारा खालील दर्शविलेल्या विवरणाचा उल्लेख करून ओपन लाइनच्या वरिष्ठ सेक्शन इंजीनियर/ सेक्शन**

**इंजीनियर (रेल पथ) सहायक विभागीय इंजी., अनुभागीय वरिष्ठ विभागीय इंजीनियर यांना लेखी स्वरूपात सूचित केले पाहिजे.**

**1.1.1** कामाचे स्वरूप, स्थळ आणि काम करणा-या एजेंसीचे नाव.

**1.1.2** कामाचा अंदाजे काळ.

**1.1.3** उपयोगात/वापरात येणा-या उपकरणांची नावे आणि अंदाजे संख्येची यादी.

1.1.4 ज्या ठिकाणी वाहनांचा उपयोग केला जाणार आहे त्या स्थानांचे विवरण.

**1.1.5 खाली उल्लेखिलेल्या बाबी संबंधी प्रमाणता.**

i) रेलवे पर्यवेक्षक तसेच ठेकेदारांचे अधिकृत पर्यवेक्षकांची उपलब्धता.

ii) निर्माण स्थळाचे प्रभारी सहायक इंजीनियर द्वारा ठेकेदारांचे पर्यवेक्षक/वाहन चालक/कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे तसेच भारतीय रेल पथ मॅन्युअलच्या पॅरा 826(iv) अनुलग्नक 8/5 मध्ये दर्शविल्याप्रमाण आवश्यक असल्यास त्यांना सक्षमता प्रमाण पत्र द्यावे.

iii) जेथे आवश्यक असेल तेथे सतर्कता आदेश, ओईएचएस, डब्ल्यू.एफ अनुदेश इ. लागू करावे.

iv) जर आवश्यक असेल तर संबंधित विभाग जसे अभियांत्रिकी, विद्युत आणि सिगनल आणि दूरसंचारच्या पर्यवेक्षकांना सूचना पाठविणे.

**1.2 प्रभारी इंजीनियर, रेलवे मार्गाच्या जवळपास खोदकाम करताना खाली उल्लेख केल्याप्रमाणे खात्री करून घेतील :-**

**1.2.1** खोदकामामुळे सेसच्या फॉर्मेशनला काही हानी पोहचणार नाही, कार्यरत रेलवे मार्गाचे स्थिरता (Settlement) खराब होणार नाही तसेच जलनित्सारक अथवा रेलवे मार्गातील वर्तमान नाल्यांमध्ये काही अडथळा निर्माण होणार नाही.

**1.2.2** गाडयांच्या सुरिक्षत संचालनाकरितां अधिकतम गतीमान माप/परिमाणां मध्ये काही हानी पोहचणार नाही.

**1.2.3** उपकरणे आणि केबल अथवा अन्य कोणत्याही प्रतिष्ठापणास (installation) काही हानी पोहचणार नाही.

**1.2.4** जर मोठया संख्येने मजूरांचा वापर करणार असाल तर कार्याच्या अवधिकरितां सतर्कता आदेश, इंजीनियरी हाथ सिगनल तसेच सतत/वरचेवर शिटी (ओइएचएस आणि डब्ल्युएफ) चे पालन करण्यांसंबंधी आदेश जारी केले जातील.

**1.2.5** ओपन लाइनशी संबंधित विभागाच्या (अर्थात अभियांत्रिकी, सिगनल आणि दूरसंचार, कर्षण वितरण इ.) पर्यवेक्षकांना जेव्हा आणि जेथे आवश्यक असेल, तर आपल्या कर्मचा-यांना हजर राहण्याकरिता सूचित केले जाईल.

**1.2.6** कामाच्या वेळेत कार्य प्रभारी रेलवे पर्यवेक्षक तसेच ठेकेदारांचे पर्यवेक्षकांना पूर्व सावधानतेची माहिती काढण्यांकरितां ज्यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे, निर्माण स्थळाचा दौरा करणे आवश्यक आहे. रेलवे मार्गाची सुरक्षा आणि सुरक्षितता अंगीकारणा करितां करण्यांत येणा-या उपायांसह कामाच्या विस्तृत योजनेची यादी तयार केली जावी.

**1.2.7** सुरक्षितता अंगीकारणाकरिता केल्या जाणा-या उपायांसबंधी निर्माण स्थळावर एक रजिस्टर ठेवले जावे तसेच राखण्यांत येणा-या सर्व पूर्व सावधानतेचा त्यात उल्लेख केला जावा. निरीक्षण अधिकारी आपल्या निरीक्षणां दरम्यान केल्या जाणा-या विविध सुरक्षितता उपायांची तपासणी करतील तसेच आपल्या नोंदवहीत त्याची नोंद करतील.

**II तटबंध/ खोदकाम/ उत्खननात भूमी-कार्य करणे, जेथे वाहने/ उपकरणांचे संचलन/ परिचालन इ. चा समावेश असावा.**

**2.** उपरोक्त उल्लेखित बाबींची खात्री केल्यानंतर कामाशी संबंधित विभाग अर्थात निर्माण, विद्युतीकरण, सिगनल आणि दूरसंचार इ. चे प्रभारी कार्यकारी/सहा.इंजीनियर अशी कामे सुरू करण्यांची परवानगी देण्यापूर्वी, जेथे सडकेवरील वाहने/मशिनींचा उपयोग आवश्यक आहे, निर्माण स्थळावर खालीलप्रमाणे खात्री करून घेतील.

कार्य प्रभारी इंजीनियर व्यक्तिगतपणे सड़क वाहने/उपकरणांना प्रमाणित करतील. ड्राइवर, सुरक्षाकर्मी तसेच पर्यवेक्षकांसोबत विचार-विनिमय करतील तसेच कार्यस्थळावर वापरण्यांकरिता सड़क वाहनांचे प्रकार, त्यांची संख्या, ड्राइवर व पर्यवेक्षाकांची संख्या तसेच कामस लागणारा अवधि व वेळेचा उल्लेख करून ठेकेदारांना लेखी स्वरूपांत परवानगी देतील. ठेकेदारांना प्रभारी इंजीनियर कडून परवानगी प्राप्त केल्याशिवाय कार्य-स्थळावर काम सुरू करण्याची परवानगी नसेल.

काम सुरू करण्यापूर्वी हे निश्चित करण्यांकरिता कि, सर्व आवश्यक उपाय केले गेले आहेत, संलग्नक-।। मध्ये दिली गेलेल्या चेक लिस्टचा उपयोग केला जाईल. कार्याचे प्रभारी इंजीनियर कार्यस्थळावर खाली उल्लेखित तयारी जी लागू असेल, त्याची खात्री करून घेतील.

**2.1.3.1** जर सर्वात जवळच्या  कार्यरत रेलवे ट्रॅकच्या मध्य रेषेपासून 6.0 मी. अंतरावर काम करण्याची  योजना असेल तर लागून असलेल्या जमीनीच्या पट्टीवर जेथे कामाकरितां सडकवाहन/मशीनचा वापर करावयाचा असेल तर, वर्तमान रेलवे ट्रॅकच्या मध्य रेषेपासून 6.0 मी.  अंतरावर अगोदरच 150 मी.मी. रूंदीची चुन्याची रेषा टाकून सिमांकन केले जाईल. तसेच ठेकेदाराकडून त्याची स्वीकृती घेतली जाईल की ज्यामुळे  वाहने/मशीन  ती रेषा पार करू शकणार नाहीत आणि कार्यरत रेलवे ट्रॅकच्या 6.0 मी. पेक्षा जवळ पोहचू शकणार नाहीत.

**2.1.3.2** जर रेलवे ट्रॅकच्या मध्य रेषेपासून 6.0 ते  3.5 मी. च्या दरम्यान काम करण्याची योजना असेल तर याची, खात्री करून घ्यावी लागेल कि :-

I. सर्वात जवळच्या कार्यरत रेलवे ट्रॅकच्या मध्य रेषे पासून 3.5मी.च्या अंतरावर लाकडी/बांबूच्या खांबावर 75 से.मी.च्या उंचीवर गडद रंगांची रिबन/नायलॉन दोरी बांधून जमिनीचे सीमांकन केले गेले आहे.

II. वाहने आणि मशीन चालविण्याचे वेळी तेथे अधिकृत रेलवे प्रतिनीधी उपस्थित असेल.

III.कार्यस्थळावर पोहोचणा-या गाडीच्या चालकांना कार्यरत रेलवे ट्रॅकच्या जवळ सडक वाहने आणि मशीनचा वापर करत असण्याबाबत सतत व्हिजल वाजविण्याकरिता योग्य सतर्कता आदेश निर्गमीत केले गेले आहेत. जेथे आवश्यक समजले जाईल तेथे विसल बोर्ड उपलब्ध केले जातील.

**2.1.3.3** जर कार्यरत रेलवे ट्रॅकच्या मध्य रेषेपासून 3.5 मी.चे आत कार्य करण्याची  योजना असेल तर याची खात्री केली जाईल कि, ब्लॉक सुरक्षेच्या अंतर्गतच काम केले जात आहे. तसेच भारतीय रेल पथ मैन्युअलचा परिच्छेद क्र.806 आणि 807  चे  अनुसार  रेलवे ट्रॅकच्या सुरक्षेकरिता आवश्यक ती सुरक्षितता पूर्व खबरदारी घेतली गेली आहे. कार्यस्थळावर न्यूनतम कनिष्ठ इंजीनियर-II स्तर च्या रेलवे पर्यवेक्षकाच्या की पस्थितिची खात्री करून घ्यावी.

**2.1.4** कार्यस्थळापासून जनता आणि प्रवाशांना दूर ठेवण्याकरितां त्याचे योग्य त-हेने सिमांकन केले जाईल. जनता/प्रवाशांना सचेत करण्याकरितां योग्य ठिकाणी ‘कार्य प्रगति वर आहे’ असे आवश्यक साइनबोर्ड सुद्धा लावले जाईल.

**2.2 असामान्य परिस्थितित परिचालकांस कार्यरत रेलवे मार्गाजवळ ट्रॅक/मशीन वर काम करत असता रेलवे मार्ग ओलांडण्याचा संशय/शंका असल्यास खालीलप्रमाणे कारवाई केली जाईल.**

i) ठेकेदार/पर्यवेक्षक/वाहन परिचालक लगेच स्थितीची माहिति रेलवे अधिका-यांना देतील तसेच रेलवे मार्ग सुरक्षित ठेवण्यांत त्याची मदत करतील.

ii) रेल पथ मैन्युअलचा परिच्छेद 806-807 च्या अनुसार जी काही घ□ना असेल, त्यानुसार सुरक्षित केले जाईल.

**2.3** रेलवे मार्गाजवळ बिना कर्मचारी वाहन/मशीन रिक्त सोडले जाणार नाहीत. जर रेलवे मार्गाजवळ सडकवाहन/मशीन आणि यंत्र सामुग्री रिक्त (कर्मचा-याविना) सोडणे अपरिहार्य असल्यास त्यांना अशा त-हेने सुरक्षितपणे सोडले जावे कि ज्यामुळे ते चालण्याच्या/चालू होण्याच्या स्थितीत राहणार नाहीत.

**2.4** ज्यावेळी सडक वाहनास मागच्या दिशेने चालविले जाईल त्यावेळी खात्री केली जावी कि, I) ज्या ठिकाणापासून वाहन वळवायचे आहे ती जागा योग्य प्रकारे सीमांकीत केलेली आहे. II) सडक वाहन चालक आपले वाहनास वळविताना किंवा मागील दिशेने फिरविताना नेहमी रेलवे मार्गाकडेच पाहील/लक्ष ठेवील. III) अशा ठिकाणी अधिकृत रेलवे प्रतिनिधीची उपस्थितीची खात्री करून घेतली जाईल.

**2.5** कार्यस्थळांवर जेथे आवश्यक असेल, प्राथमिकतेच्या आधारे संचार (phone) सुविधा उपलब्ध केल्या जाईल.

**2.6** जर काही बाधा असतील तर कार्यस्थळाची सुरक्षा सामान्य आणि सहायक नियमांच्या परिच्छेद 15.09 अनुसार निश्चित केली जाईल.

**2.7** कार्याच्या दरम्यान सर्व आवश्यक उपाय केले जात आहेत याची खात्री करण्याकरिता अनुलग्नक-II मध्ये दिली गेलेली चेक लिस□चा उपयोग केला जाईल.

**III. कार्यरत रेल पथ /वर्तमान लाइन वर काम करणे.**

**3.1** अभियांत्रिकी कार्य जसे कि टर्नआऊट स्लीपर टाकणे, ग्लूड जाईंट लावणे इत्यादि चालू रेलवे मार्गावरच केले जात आहेत. रेलवे मार्गाचा हा भाग अस्थायी रूपात कार्याचे प्रभारी इंजीनियरच्याच नियंत्रणांत असतो. जसे कि, संयुक्त इंजीनियरी आणि निर्माण परिपत्रक क्र.148 मध्ये उल्लेख आहे तसेच सतर्कता आदेशातून मोकळीक दिल्यानंतर (हा भाग) यास पुन: अनुभागीय प्रभारी यांकडे सूपूर्द केला जा□ल. या काळांत कार्याचे प्रभारी इंजीनियरकडूनच रेल्वे मार्गाच्या सुरक्षितेची खात्री करून घेतली जा□ल.

**3.2** जर आवश्यक असेल तर कार्याचे प्रभारी इंजीनियर द्वारा मसौदा परिपत्रिक नोटिस प्रकाशित केला जा□ल.

**3.3** कार्यास सुरूवात करते वेळी (निष्पादन) भारतीय रेल पथ मैन्युअलचा परिच्छेद 806 आणि 807च्या अनुसारच रेलवे मार्गाची सुरक्षितता केली जावी.

**3.4** गति प्रतिबंधात केवळ अनुभागीय पर्यवेक्षकाद्वारेच सूट दिली जावी.

**3.5** उरलेली सामग्री जसे रेल, स्लिपर इत्यादी चालू रेलवे मार्गास अडथळा न पोहचता एके ठिकाणी गोळा करण्यांकरिता जागे संबंधी ओपन लाइनच्या रेल पथ निरीक्षकां सोबत विचार विनिमय करून अगोदरच ठरविले जावे.

**IV कटिंग भागात/भागावर काम करताना/करते वेळी घेतली गेलीली अतिरिक्त पूर्व खबरदारी.**

**4.1** रेल्वेच्या सीमेच्या आत मशीनचे शिफ्टिंग जेथे आवश्यक असेल, रेल्वेचे पर्यवेक्षण/रेलवे मार्गाची सुरक्षितता/रहदारी ब्लॉक च्या अंतर्गतच केली जा□ल.

**4.2** एकदा गाडीने ब्लॉक सेक्शन मध्ये प्रवेश केला की या कार्यस्थळावरून गाड़ी निघून जा□पर्यंत भूमी संबंधीचे कामे करणारी मशीन/यंत्रे चालविण्याची परवानगी दिली जाऊ नयें.

**4.3** गाडीला कार्य स्थळावरून पार होण्याची परवानगी देण्यापूर्वी कुठलाही निघालेला/ढिला झालेला दगड अथवा उभ्या उतरंडीस, जी पडण्याचा संभव असेल, मोकळे सोडू नये.

**V. खाली उल्लेखिलेले परिपत्रक ज्यात विविध विशेष कार्यासंबंधी पूर्व सुरक्षितता सावधानतेचा उल्लेख केला गेला आहे. त्याचा संदर्भ पाहिला जावा.**

**5.1.** विस्फोट, कटिंग भागाची रूंदी वाढविणे अथवा पूलांचा विस्तार इ. कामांकरितां इंजीनियरी आणि विद्युत विभांगामार्फत फाइल क्र.डब्ल्यू.742 टीएम.19 द्वारा जारी केलेले संयुक्त परिपत्रक क्र.146 मध्ये उल्लेखित प्रक्रिया तसेच पूर्व सावधगिरीचा संदर्भ पहावा.

**5.2** इंजीनियरी ओपन लाइन तसेच निर्माण विभाग द्वारा जारी संयुक्त परिपत्रक क्र.148 मध्ये त्या कार्यांकरिता सम्मिलित केली गेलेली 'संरक्षा पूर्व सावधानी', जसे कि पुलांचा विस्तार, कटिंगची रूंदी वाढविणे इत्यादि कामांत रेलवे मागौची सुरक्षितता प्रभावित होत आहे यांचे पालन केले जावे.

**5.3** **'निर्माण संगठन'** द्वारे दि. 09/02/2004 के पत्र क्र. इ.डब्ल्यू /187/ आर/465/कॅम्प/सर्कु. च्या अंतर्गत **'निर्माण कार्य स्थळावर संरक्षा'** पुस्तिका सर्व निर्माण अधिका-यांना परिपत्रित केली गेलेली आहेत.

**5.4** रेलवे बोर्ड द्वारे अध्यक्ष, रेलवे बोर्डचे दि.17.12.07 च्या पत्र क्र.2004/सिग/जी7/च्या अंतर्गत सिगनलींग, विद्युत आणि संचार केबलच्या जागेवर खोदकामाचे कार्यासंबंधी जे.पी.ओ.एन./ आई.सिग. /2004 परिपत्रित केले गेले आहेत. जे.पी.ओ.च्या शर्तीचे/तरतूदीचे पालन केले जावे.

हस्ता.

( बी.डी. कुमार )
प्रधान मुख्य इंजीनियर
मध्य रेल